.. jANIva ..

# ॥ जाणीव ॥

दिवाणखान्यात टी. व्ही. आल्यापासून मी बोलणं विसरलो आहे
दारात गाडी आल्यापासून मी चालणं विसरलो आहे
खिशात कॅलक्युलेटर आल्यापासून पाढे म्हणणे विसरलो आहे
ऑफिसमध्ये ए.सी.त बसून झाडाखालचा गारवा विसरलो आहे
रस्त्यावर डांबर आल्यापासून मातीचा वास विसरलो आहे
मनालाच इतके श्रम होतात शरीराचे कष्ट विसरलो आहे
कचकड्यांची नाती जपताना प्रेम करायला विसरलो आहे
बँकातली खाती सांभाळताना पैशाची किंमत विसरलो आहे
उत्तेजक चित्रांच्या बरबटीमुळे सौंदर्य पहाणं विसरलो आहे
कृत्रिम सेंटच्या वासामुळे फुलांचा सुगंध विसरलो आहे
फास्ट फूडच्या जमान्यात तृप्तीची ढेकर विसरलो आहे
पॉप-रॉकच्या दणदणाटात संगीत समाधी विसरलो आहे
क्षणभंगुर मृगजळामागे धावताना सत्कर्मातला आनंद विसरलो आहे
माझीच तुंबडी भरताना दुसऱ्यांचा विचार करणं विसरलो आहे
सतत धावत असताना क्षणभर थांबणं विसरलो आहे
जागेपणीचे सुख जाऊच द्या सुखानं झोपणेही विसरलो आहे
साधनांसारखे विनोदही कृत्रिम, खळखळून हसणं विसरलो आहे
आणि, हसणं विसरल्याने जीवनच जगणे विसरलो आहे

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated July 21, 2005



From http://sanskritdocuments.org